# सायबर सुरक्षेवर विद्यार्थ्यांमध्ये जागृती

**प्रतिनिधी** | धुळे

पुणे येथील क्विक फाउंडेशन व पोलिसांच्या सायबर सेलतर्फे शहरातील एसएसव्हीपीएस संस्थेच्या डॉ. पी. आर. घोगरे विज्ञान महाविद्यालयात सायबर सुरक्षेवर सायबर शिक्षा कार्यशाळा झाली. सायबर हल्ला ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील समस्या झाली आहे. त्यामुळे सायबर सुरक्षेवर जागृती होणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन ही कार्यशाळा झाली.

कार्यशाळेत सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस कॉन्स्टेबल दिलीप वसावे यांनी धुळे जिल्ह्यात घडलेल्या विविध सायबर गुन्ह्यांची माहिती दिली. सायबर गुन्ह्यांचा तपास कसा केला जातो, सायबर हल्ल्यापासून वाचण्यासाठी



सायबर सुरक्षेवर बोलताना मान्यवर.

काय खबरदारी घ्यावी याची माहिती त्यांनी दिली. तसेच गरज पडल्यास १९३० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. क्विक फाउंडेशनच्या सुगंधा दाणी यांनी सोप्या भाषेत सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. वैयक्तिक माहिती आपल्या जवळ असलेल्या पैशापेक्षाही महत्त्वाची आहे. त्यामुळे ही माहिती कोणालाही देऊ नये असे आवाहन त्यांनी केले. तसेच नकळत सायबर हल्ल्यामध्ये आपण कसे ओढले जाऊ शकतो याचे त्यांनी उदाहरण दिले. प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. रूपाली पाटील यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपप्राचार्य किशोर बोरसे, संगणक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. राकेश देवरे, डॉ. एस. एन. कोतकर, प्रा. अशोक पवार, प्रा. राहुल चौधरी, प्रा. सायली नंदन, प्रा. किशोर देसले, प्रा. अमित उंबरे, प्रा. वैशाली पाटील, जयेश गोरे, श्रुती विसपुते, गणेश पाटील यांनी प्रयत्न केले.